श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव.**

समितीकडील प्लास्टीक साखर बारदाना, सुतळी बारदाना व रिकामे तेल डबे इ. जाहीर लिलाव करणेत येत आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी दि.२३/०५/२०१७ रोजी सं.११.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज व अनामत रक्कम रू.१०,०००/— डी.डी./रोख स्वरुपात संत तुकाराम भवन येथे भरणे आवश्यक आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व लिलाव फॉर्म संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

क्र.लाडूप्रसाद/कावि/४१/२०१७ दि. १२/०५/२०१७

सही xxx

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०)

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव

**माहिति, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. मालाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशिल | अंदाजे नग | किमान बोलीची किंमत (रू.) प्रतिनग |
|---|---|---|---|
| १ | प्लास्टीक साखर बारदाना (५० किलो) | १५०० | ५/— |
| २ | खराब प्लास्टीक साखर बारदाना (५० किलो) | ५०० | ३/— |
| ३ | सुतळी बारदाना (५० किलो) | ८०० | १०/— |
| ४ | खराब सुतळी बारदाना (५० किलो) | ३०० | ७/— |
| ५ | रिकामा तेल डबा | ७००० | २१/— |
| ६ | रिकामा खराब तेल डबा | १००० | १५/— |

२. नमूना लिलाव फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. लिलाव फॉर्म भरून दि.२३/०५/२०१७ सं.११.००वा. पर्यंत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले फॉर्म विचारात घेतले जाणार नाहीत.

३. लिलाव फॉर्म सोबत अनामत रक्कम रू.१०,०००/— चा कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. सादर करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म व अनामत रकमेचा डि. डी. सिलबंद पाकिटात दि.२३/०५/२०१७ रोजी सं.११.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. **सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रं. व रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव फॉर्म असे नमुद करणे आवश्यक आहे.** सिलबंद लिलाव फॉर्म दि.२३/०५/२०१७ रोजी दु.१२.०० वा. संत तुकाराम भवन येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजुर करण्यात येईल.

४. ज्याचे नावे लिलाव मंजुर होईल त्यांनी लिलावाची होणारी २५% रक्कम त्याच दिवशी भरणा केली पाहिजे आणि उर्वरीत ७५% रक्कम पुढील पंधरा दिवसात भरून माल उचलणे आवश्यक आहे.

५. मुदतीत रक्कम भरली नाही अथवा माल उचलला नाही तर सदरचा लिलाव रद्द केला जाईल व अनामत रक्कम व २५% रक्कम जप्त करण्यात येईल.

६. लिलावातील माल एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर व संत तुकाराम भवन, पंढरपूर या ठिकाणी दि. १३/०५/२०१७ ते दि.२२/०५/२०१७ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

७. सदरचे साहित्य लिलाव धारकांने स्वत:चे मजुर व वाहन लावून मंदिर समितीचे प्रतिनिधी समोर उचलणेचे आहे.

८. नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसंन्स/राष्ट्रीय बॅकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच लिलावाचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

९. रहिवासाच्या पुराव्यासाठी स्वत:चे नावचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव लिलाव प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

११. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

——————‘‘————————

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलावात सहभागी होणेसाठी अर्ज.

दिनांक /०५/२०१७

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषय:— रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलाव.

अर्जदाराचे पूर्ण नाव :— ——————————————————————

पूर्ण पत्ता :— ——————————————————————
——————————————————————

मोबाईल कं.:— ——————————————————————

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दिनांक १३/०५/२०१७ रोजीचे दै.संचार, सोलापूर वर्तमानपत्रातील समितीच्या रिकामा बारदाना व तेल डबा जाहीर लिलावाची जाहिरात वाचली असून मला सदर लिलावात सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू.१०,०००/— रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या लिलावाबाबतच्या मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

१. अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅकेचे नांव, डी.डी. कमांक व दिनांक (सोबत डि.डि जोडला आहे.)

——————————————————————————————

२. अनामत रक्कम रोख भरली असल्यास पावती कमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

——————————————————————————————

३. सोबत ओळखीचा पूरावा म्हणून ————————————————ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

४. सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून ————————————————ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

२/— रिकामा बारदाना व तेल डबा खरेदीचा माझा दर मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ. क्र. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) प्रति नग | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत (रू.) प्रतिनग |
|---|---|---|---|
| १ | प्लास्टीक साखर बारदाना (५० किलो) | ५/— | |
| २ | खराब प्लास्टीक साखर बारदाना (५० किलो) | ३/— | |
| ३ | सुतळी बारदाना (५० किलो) | १०/— | |

| अ. क्र. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) प्रति नग | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत (रू.) प्रतिनग |
|---|---|---|---|
| ४ | खराब सुतळी बारदाना (५० किलो) | ७/— | |
| ५ | रिकामा तेल डबा | २१/— | |
| ६ | रिकामा खराब तेल डबा | १५/— | |

सदरच्या मी नमुद केलेल्या दराने रिकामा बारदाना व तेल डबा खरेदी करण्यास बांधील राहील.

आपला विश्वासू,

(नाव व सही)